# दलित चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान व कार्य

**प्रा. डॉ. उमेशकुमार पी. शहारे**
(राज्यशास्त्र विभाग प्रमुख तथा रासेयो प्रमुख)
स्व.नि.पा.वाघाये महा. लाखनी, जि.भंडारा
मोबाईल नंबर : ९८५०२२३९६२, ८०८०८३५९३३
ई.मेल: kanchanumesh358@gmail.com

---

**प्रस्तावना :—**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे मूळ नाव भीमराव होते. त्यांचे वडील रामजी मालोजीराव सकपाळ महू येथे मेजर सुभेदार पदावर सैनिकी अधिकारी होते. १४ एप्रिल १८९१ रोजी दुपारी १२ वाजता रामजी सुभेदार आपल्या कर्तव्यावर असताना भीमराव यांचा जन्म झाला. रामजी व भीमाबाई या दांपत्यांना सन १८९१ पर्यंत चौदा अपत्य झाली होती. त्यापैकी गंगा, रमा, मंजुळा व तुळसा या चार मुली जीवंत राहिल्या होत्या. मुलांपैकी बाळाराम, आनंदराव व भीमराव (भिवा) ही तीन मुले जिवंत होती. भीमराव सर्वात लहान व चौदावे अपत्य होते.

१८९४ मध्ये सुभेदार रामजी सकपाळ इंग्रजी सैन्यातील मुख्याध्यापक पदाच्या नोकरीवरून निवृत्त झाले आणि महाराष्ट्रातील रत्नागिरी जिल्ह्यातील आपल्या मूळ गावी दापोली येथे परिवारासह राहू लागले. भीमराव वयाने लहान असल्यामुळे कॅम्प दापोली येथील शाळेत त्यास प्रवेश मिळाला नाही व घरीच भीमरावास अक्षर ओळख करून द्यावी लागली. इ.स. १८९६ च्या नोव्हेंबर महिन्यात सातारा येथील कॅम्प स्कूल या मराठी शाळेमध्ये भीमरावाचे नाव दाखल केले. त्यांच्या या स्थनांतरानंतर थोडया कालावधी मधे मस्तक शूल या आजाराने आंबेडकरांच्या आई भीमाबाईचे निधन झाले, त्यावेळी आंबेडकर ५ वर्षाचे होते. त्यानंतर भीमासह व अन्य मुलांची संगोपन त्यांच्या आत्या मीराबाईंनी कठीण परिस्थितीत केले.

बाळ भीमराव यांचे प्राथमिक शिक्षण दापोली व सातारा येथे झाले. डिसेंबर १९०४ मध्ये रामजी सकपाळ सहपरिवार मुंबईला आले व तेथील लोअर परळ भागातील डबक चाळ परिसरात एका १० बाय २० च्या खोलीत राहू लागले. शाळेत असतानाच १९०६ मध्ये १४—१५ वर्षीय भीमरावांचे लग्न दापोलीच्या भिकू वलंगकर यांची ९ वर्षीय कन्या रमाबाई यांच्याशी झाले. १९०७ मध्ये त्यांनी मुंबईतील एल्फिन्स्टन स्कूलमधून मॅट्रिकची परीक्षा दिली. या प्रसंगी त्यांचा सत्काराचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता आणि भेट म्हणून त्यांचे शिक्षक कृष्णाजी अर्जुन केळुसकर यांनी त्यांना 'बुध्द चरित्र' हा स्वलिखित पुस्तक भेट दिले. हायस्कूलमधील अनेक शिक्षक त्यांच्याशी तिरस्काराने वागत असत. आंबेडकर हे आपल्या विद्यार्थी जीवनात दररोज १८ तास अभ्यास करत असत. बडोदा नरेश सयाजीराव गायकवाड यांची शिष्यवृत्ती प्राप्त झाल्यानंतर भीमराव यांनी १९१२ मध्ये मुंबई विद्यापीठातून अर्थशास्त्र आणि राज्यशास्त्र विषय घेऊन पदवी संपादन केली. संस्कृत विषय घेण्यास विरोध असल्यामुळे ते पर्शियन विषय घेऊ उत्तीर्ण झाले आणि बडोदा संस्थानात नोकरीवर रूजू झाले. याच वर्षी १२ जानेवारी १९१२ रोजी त्यांना पहिला मुलगा यशवंत झाला. त्याच सुमारात २ फेब्रुवारी १९१३ रोजी मुंबईमध्ये त्यांचे वडील रामजींचे आजाराने निधन झाले.

**कोलंबिया विद्यापीठ :—**

बी.ए. नंतर एम.ए. अभ्यासाठी बडोद्याचे राजे सयाजीराव गायकवाड यांची पुन्हा शिष्यवृत्ती मिळवून अमेरिकेच्या कोलंबिया विद्यापीठात प्रवेश केला. १९१५ मध्ये त्यांनी पदव्युत्तर पदवी परीक्षा दिली. यासाठी त्यांनी 'प्राचीन भारतीय व्यापार' हे संशोधन लिहिले. त्यानंतर १९१६ मध्ये त्यांनी अमेरिकेन कोलंबिया विद्यापीठातूनच पीएच.डी. पदवी मिळवली. त्यांचे पीएच.डी. मध्ये 'भारताचा राष्ट्रीय लाभांश: इतिहासात्मक आणि विश्लेषणात्मक अध्ययन' हा या संशोधनाचा विषय होता.

**लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स अँड पॉलिटिकल सायन्स :—**

कोलंबिया विद्यापीठात एम.ए. व पीएच.डी या पदव्यांसाठी आंबेडकरांनी अर्थशास्त्राचा अभ्यास केला होता, त्यामुळे बी.एस्सी.ची परीक्षा न देता थेट एम.एस्सी. साठी प्रवेश मिळावा, अशी प्रा. कॅनन यांच्या शिफारशीसह असलेली विनंती लंडन विद्यापीठाने मान्य केली. शिष्यवृत्ती संपल्यावर त्यांना भारतात परत येणे आवश्यक होते. लंडन स्कूल ऑफ इकॉनॉमिक्स



Late N.P.W. College, Lakhani Dist. Bhandara
Ref. No. ...... Dt. ......
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Dist. Bhandara

अँड पॉलिटिकल सायन्स येथे त्यानी एम.एस्सी. आणि डी.एससी आणि कायदा संस्थेत बार–एट–लॉ पदवीसाठी स्वत:ची नोंदणी केली. परंतु त्यांच्या एक वर्ष शिष्यवृत्तीची कालमर्यादा संपल्यामुळे अभ्यास अर्धवट सोडून त्यांना भारतात परतावे लागले. लंडन सोडण्यापूर्वी आंबेडकरांनी पुढील चार वर्षाच्या कालमर्यादेत म्हणजे ऑक्टोबर १९१७ ते सप्टेंबर १९२१ पर्यंत कोणत्याही वेळी लंडन येऊन आपला अपूर्ण राहिलेला अभ्यास करण्यासाठी पुन्हा प्रवेश घ्यावा, अशी लंडन विद्यापीठाकडून परवानगी मिळवली होती. सर्वप्रथम, शिष्यवृत्तीच्या अटनुसार त्यांनी बडोदाच्या राजाच्या दरबारात लष्करी अधिकारी आणि आर्थिक मल्लागाराची जबाबदारी स्वीकारली. येथे आंबेडकर अस्पृश्य असल्याने आपल्या कार्यालयात अन्य सहकारी व कर्मचारी त्यांचा सतत अपमान करीत असत. संपूर्ण शहरात त्यांना भाडयाने घर देण्यास कोणीही तयार नसलयाच्या गंभीर समस्येमुळे काही काळानंतर ते मुंबईला परत आले. परळ येथे राहून डबक चाळ व श्रमिक कॉलनी येथे राहून त्यांनी अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी अर्धवेळ प्राध्यापकाची व वकिली करून आपली पत्नी रमाबाई यांच्यासोबत जीवन व्यतीत केले.

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सर्वात महत्वाची संकल्पना मांडली ती 'शेतीचे राष्ट्रीयकरण' करण्याची. शासनाने शेतजमिनी ताब्यात घेऊन, त्या विकसित कराव्यात व अशा विकसित शेतजमिनी शेतकऱ्याना काही अटींवर कसण्यासाठी द्याव्यात. हा एका अर्थाने सामुदायिक शेतीचाच प्रयोग होता. अशी शेती करण्यासाठी शासनाने अधिनियम बनवावेत. पीकपध्दती, पाणी उपलब्धता, बांधबंदिस्ती, उत्पादकता वाढ, साठवण व्यवस्था, शेतमालाची विक्री, शेतमालाचे भाव या संदर्भात स्पष्ट नियम करावेत. यामुळे कोणत्याही एकाच पिकाखाली मोठे क्षेत्र येऊन, शेतमालाच्या उपलब्धतेत विषमता येणार नाही. मागणी व पुरवठा या अर्थशास्त्रीय नियमानुसार, शेतमालाला रास्त भाव मिळतील. त्याचबरोबर अतिरिक्त उत्पादन टळून शेतमालाचे नुकसानही टळेल. आजही शेतकऱ्यांना शेतमालाला रास्त भाव मिळावा यासाठी शासनाशी झगडावे लागते. या पार्श्वभूमीवर डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे शेतीसाठी अधिनियम व कायदा असावा ही संकल्पना शेतकऱ्यांसाठी किती मोलाची आहे. हे अधोरेखित होते.

**अशिक्षित व गरीब लोकांना जागरूक करण्याचे काम :–**

१९१९ मध्ये डॉ. आंबेडकर यांनी गव्हर्नमेंट ऑफ इंडिया ॲक्ट बाबत राजकीय सुधारणांसाठी साऊथब्युरो कमिशन पुढे आपले विचार मांडले. यावेळी त्यांनी दलित व इतर मागासलेल्या समाजांसाठी वेगळे मतदान संघ व आरक्षण यांची मागणी केली. १९२० साली त्यांनी मुंबईत मूकनायक नावाचे वृत्तपत्र सुरू केले त्यावेळी शाहू महाराजांनी त्यांना २००० रूपयेची आर्थीक मदत दिली. आंबेडकरांनी मागासवर्गीयांच्या उत्थानासाठी बहिष्कृत हितकारिणी सभा सुरू केली.

अशिक्षित आणि गरीब लोकांचे जनजागृती करण्यासाठी त्यांनी मूकनायक आणि बहिष्कृत भारत साप्ताहिक मासिकांचे संपादन केले. याच दरम्यान त्यांचा अपूर्ण अभ्यास पूर्ण करण्यासाठी ते लंडन आणि जर्मनी येथे गेले आणि एम.एससी., डी. एस.सी. आणि बॅरिस्टर या पदव्या प्राप्त केल्या. त्यांच्या एम.एस.सी. चा संशोधन विषय हा ''भारतीय शाही अर्थव्यवस्थेचे प्रांतीय विकेंद्रीकरण'' होता. तर डी.एससी पदवीचा विषय हा 'द प्रॉब्लम ऑफ रूपी' (रूपयाचा प्रश्न) होता.इंग्लंमध्ये शिकत असताना ज्या अभ्यासक्रमाला ८ वर्षे लागतात तो आंबेडकरांनी २ वर्षे ३ महिण्यात यशस्वी तऱ्हेने पूर्ण केला होता. यासाठी त्यांना दररोज २४ तासांपैकी २१ तास अभ्यास करावा लागला होता.

**मानद उपाधी :–**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना ५ जून १९५२ रोजी अमेरिकेतील कोलंबिया विद्यापीठातून एल.एल.डी. आणि उस्मानिया विद्यापीठातून डी.लिट. ची मानद उपाधी देण्यात आली. १९५५ मध्ये, काठमांडू, नेपाळ येथे झालेल्या जागतिक बौध्द परिषदेत सहभागी बौध्द भिक्खुंनी त्यांना 'बोधिसत्व' ही उपाधी प्रदान केली. त्यांना बीए, एमए, एमएससी, पीएचडी, बॅरिस्टर एट लॉ, डीएससी, डी.लिट असे एकूण ३२ मानद उपाध्या मिळाल्या आहेत. २०१२ मध्ये, ''द ग्रेटेस्ट इंडियन'' नावाच्या सर्वेक्षणात आंबेडकरांची 'सर्वश्रेष्ठ भारतीय' म्हणून निवड करण्यात आली आहे.

**बाबासाहेबांचे योगदान :–**

भारतरत्न डॉ. बी.आर. आंबेडकरांनी आपल्या आयुष्याच्या ६५ वर्षात विविध क्षेत्रात सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक, धार्मिक, ऐतिहासिक, सांस्कृतिक, साहित्यिक, औद्योगिक, घटनात्मक इत्यादी क्षेत्रात असंख्य कामे करून राष्ट्र उभारणीत महत्वपूर्ण योगदान दिले. अस्पृशांना समाजाबाहेर ठेऊन, त्यांना नागरी, धार्मि वा राजकीय हक्क देण्यात आले नव्हते. त्यांच्या अधिकारांप्रती त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे हा उद्देश होता. आंबेडकरांनी सायमन कमिशनकडे एक पत्र



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

Late N. P. W. College, Lakhani Distt. Bhandara
Ref No.
Dt.

सादर केले व त्यात त्यांनी मागासवर्गीयासाठी मार्गदर्शन राखीव जागा आरक्षित ठेवाव्यात अशी मागणी केली. तसेच लष्कर नौदल व पोलीस खात्यात मागासवर्गीयांची भरती करण्यासंदर्भातील त्यांना मागणी केली होती. यानंतर हिंदुस्थानात सरकारतर्फे अस्पृश्यांच्या कल्याणासाठी शाळा, वसतिगृह व ग्रंथालये सुरू करण्यात आली.

जातपात तोड मंडळाच्या (सन १९३६) लाहोरच्या अधिवेशनासाठी तयार केलेल्या भाषणाद्वारे जाती निर्मूलन व त्याचा ग्रंथ भारतीय धर्मग्रंथातील मिथ्यांकित आणि अंधश्रद्धा यापासून मुक्त करण्याचे काम केले. हिंदू विवाहक बहिष्कार घटस्फोटाची, मालमत्तेतील वारसा इत्यादी तरतुदींच्या अंमलबजावणीसाठी त्यांनी आयुष्यभर प्रयत्न केला.

१९४५ मध्ये त्यांनी आपल्या पीपल्स एज्युकेशन सोसायटीच्या माध्यमातून मुंबईतील सिद्धार्थ महाविद्यालय आणि औरंगाबादमध्ये मिलिंद महाविद्यालयाची स्थापना केली. हिंदू धर्मात आपल्याला समतेची वागणूक दिल्यास सर्वो सत्तांशी त्यांनी मोठा लढा दिला. शेवटी या सनातन्यांच्या अमानवी वृत्तीला कंटाळून बाबासाहेबांनी हिंदू धर्म त्यागाचा म्हणजेच धर्मांतराचा निर्णय घेतला. आपल्या समाजातील मोठा जनसमुदाय या हिंदू धर्माचा त्याग करण्यास तयार आहे हे कळल्यावर बाबासाहेबांवर दुसरी जबाबदारी येऊन पडली. ती म्हणजे पर्यायी धर्म निवडायचा तर कुठला? तर त्यासाठी त्यांनी सन १९३५ च्या आपल्या धर्मांतराच्या घोषणेनंतर २१ वर्षे जगातील विविध प्रमुख धर्मांचा अभ्यास केला होता. त्यानंतर त्यांचा कल मूळ भारतातील असलेला मानवतावादी व विज्ञानवादी धर्म म्हणून बौद्ध धम्माकडे वळला. बौद्ध धर्मासह १४ ऑक्टोबर १९५६ रोजी ५ लाख अनुयायांसह नागपुरात बौद्ध धम्माची दीक्षा घेतली आणि 'द बुद्ध अँड हिज धम्म' या ग्रंथाच्या माध्यमातून भारतात बौद्ध धम्म पुनर्स्थापित केला.

**सामाजिक आणि धार्मिक योगदान :–**

दलितांचे मंदिर प्रवेश, पिण्याचे पाणी, अस्पृश्यता, जातीवाद अशा अनेक रूढी परंपरा सामाजिक बंधने निर्मूलन करण्यासाठी मनुस्मृति दहन (१९२७), महाड सत्याग्रह (वर्ष १९२८), काळाराम मंदिर नाशिक सत्याग्रह (वर्ष १९३०), येवला येथील धर्मांतराची घोषणा (वर्ष १९३५) यांसारखे अनेक आंदोलने बाबासाहेबांनी केली.

दलित, शोषित, पीडित, वंचित व शेतकरी लोकांना जागे करण्यासाठी १९२० ते १९५६ या कालावधीत त्यांनी मूक नायक, बहिष्कृत भारत, समता, जनता आणि प्रबुद्ध भारत अशी पाच साप्ताहिके आणि मासिक नियतकालिकाचे संपादन केले.

बहिष्कृत हितकारिणी सभेच्या माध्यमातून सामाजिक व राजकीयदृष्ट्या तळागाळात फेकल्या गेलेल्यांना भारतीय समाजातील इतरांच्या बरोबर आणणे, अस्पृश्यांना समाजाबाहेर ठेऊन, त्यांना नागरी, धार्मिक व राजकीय हक्क देण्यात आले नव्हते. त्यांच्या अधिकारांप्रती त्यांच्यामध्ये जागृती निर्माण करणे हा उद्देश होता.

**आर्थिक, कृषीआणि प्रशासकीय योगदान :–**

डॉ. आंबेडकर यांनी लिहिलेल्या 'द प्रॉब्लम ऑफ रुपी' (रुपयाचा प्रश्न) या शोध प्रबंधाच्या आधारे–रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाची स्थापना १ एप्रिल १९३५ साली झाली. भारताच्या मूलभूत आर्थिक विचारांचा पाया देखील आंबेडकरांच्या आर्थिक विचारांवर घातला गेला.

''भारतीय शाही अर्थव्यवस्थेचे प्रांतीय विकेंद्रीकरण'' या त्यांच्या दुसऱ्या संशोधन कार्याच्या जोरावर देशात वित्त आयोगाची स्थापना झाली.

शेतीला शाश्वत पाणी पुरविण्यासाठी नदीच्या पाण्याचे नियोजन झाले पाहिजे. देशात वडगाणे दुष्काळ हे मानवनिर्मित आहेत. दुष्काळ हटवायचा तर दुष्काळात पाण्याचे नियोजन करावे. जिरायती शेती, बागायती करण्याचे प्रयत्न वाढवावेत. शेती व शेतमजूर समृध्द झाला तर देश समृध्द होईल, असे मौलिक विचार त्यांनी मांडले. पाण्यासंदर्भात केवळ विचार व्यक्त न करता त्यांनी ब्रिटिश सरकारला, नदीच्या खोऱ्यातील पाण्याच्या नियोजनाची योजना सादर केली. ही योजना 'दामोदर खोरे परियोजना' म्हणून ओळखली जाते.

**संविधान आणि राष्ट्र निर्माण :–**

स्वातंत्र्य, समता, बंधुता आणि न्याय तत्वावर आधारित समाजरचना घडवण्यासाठी २ वर्षे ११ महिने आणि १८ दिवस अहोरात्र मेहनत करून डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारताची राज्यघटना लिहिली. तत्कालीन राष्ट्रपती डॉ. राजेंद्र प्रसाद यांना २६ नोव्हेंबर १९४९ रोजी सुपूर्द केली. सामाजिक, धार्मिक, आर्थिक, राजकीय, न्याय, विचार अभिव्यक्ती, विश्वास,



Off. Principal
Late N.P.W. College

श्रध्दा आणि उपासना याचे 'स्वातंत्र्य', दर्जाची आणि संधीची समानता निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा आणि त्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा आणि राष्ट्राची एकात्मता आणि अखंडता याचे आश्वासन देणारी बंधुता प्रस्थापित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून भारत एक सार्वभौम, समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य घडवण्याचा हक्क या संविधानाद्वारे सर्व भारतीयास प्राप्त करून दिला आहे.

हिंदु कोड बिल (हिंदू संहिता विधेयक) हे भारतातील स्त्रियांचा सशक्तीकरणासाठी एक पाऊल होते. आंबेडकरांनी १९४७ पासून ४ वर्षे १ महिना २६ दिवस काम करून हिंदू कोड बिल तयार केले. हा मसुदा संसदेत ५ फेब्रुवारी १९५१ रोजी संसदेत मांडला गेला. त्यात जी व्यक्ती निवडणूक आयोग, नियोजन आयोग, वित्त आयोग, स्त्री पुरूष एकसमान नागरी हिंदू कोड बिल, राज्य पुनर्गठन, मोठया आकाराचे राज्ये लहान आकारात संघटित करणे, राज्य धोरणाचे निर्देशक तत्व, मुलभूत हक्क, मानवाधिकार, नियंत्रक व महालेखा परीक्षक, निवडणूक आयुक्त आणि राजकीय संगठन मजबूत करणारे सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक आणि परराष्ट्र धोरण तयार केले?

लोकशाही बळकट करण्यासाठी, देशातील तिन्ही अंगाना न्यायपालिका, कार्यकारी मंडळ आणि विधिमंडळ स्वतंत्र केले. आणि समान नागरी हक्कानुसार एका व्यक्तीचे, एक मत आणि एक मूल्यचे तत्व प्रस्थापित केले. भारतीय संविधान सभेने जात, धर्म, लिंग, प्रांत, भेट करून मानवप्राण्यात कायदा भेदाभेद करणार नाही, न्यायाच्या तराजू सर्वांना एकाच मापात तोलले जाईल, अशी घोषणा करून स्वातंत्र्य व समता या तत्वांचा अंगिकार केलेला होता तरीही हिंदू स्त्रियांना त्यांचे न्याय हक्क देण्यास विरोध झाला. हा कायदा पास न झाल्याने बाबासाहेबांनी स्वतंत्र भारताच्या पहिल्या कायदामंत्री पदाचा राजीनामा दिला.

१९५५ मध्ये, भाषिक राज्यांवरील त्यांचा ग्रंथ प्रकाशित करून, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, बिहार, उत्तर प्रदेश आणि महाराष्ट्राची छोटया व व्यवस्थापकीय राज्यात पुनर्रचना करण्याचा प्रस्ताव ठेवला, जे ४५ वर्षानंतर काही राज्यात खरे ठरले.

**दलित चळवळीतील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे योगदान व कार्य :–**

दलित समाजात क्रांतीसूर्य, ज्ञानसूर्य म्हणून ज्यांचा उल्लेख केला जातो. त्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा जन्म झाला. त्यांनीच भारतातील संपूर्ण दलितांचे प्रतिनिधीत्व केले. त्यांच्या नेतृत्वात महाराष्ट्रात महारांची चळवळ सुरू झाली. ती चळवळ संपूर्ण भारताच्या पातळीवर अंमलात आणली गेली. डॉ. बाबासाहेब आंबेडकर हे जातीने महार होते. आणि संपूर्ण भारतातील दलितांचे पुढारी होते. ब्रिटिशांबरोबर आणि जातिवंत हिंदूबरोबर दलितांच्या मागण्यांसाठी बोलणी करतांना ते पूर्ण देशभरातील दलितांचे प्रतिनिधीत्व करीत होते. त्यांच्या नेतृत्वात २० व्या शतकात १९२० मध्ये अस्पृश्यताविरोधी चळवळ महाराष्ट्रात उभारण्यात आली? हया ना त्या स्वरूपात ती चळवळ आजपर्यंत सुरू आहे? हया चळवळीची मुळ जरी महाराष्ट्रात रोवली गेली तरी ती देशाच्या इतर भागामध्येसुध्दा पसरली आणि तिला अखिल भारतीय स्वरूप प्राप्त झाले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर अस्पृश्यांचे पुढारी म्हणून उदयाला आले. आधुनिक समाजातील अत्युच्च वर्गातील लोकांशी सामाजिक आणि आर्थिक समानता मिळविण्यासाठी राजकिय मार्गाचा अवलंब केल्यास अस्पृश्यांचा फायदा होईल, ही गोष्ट लक्षात घेवुन डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यताविरोधी चळवळ उभी केली. त्यांनीच ब्रिटिशांसमोर दलितांसाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. १९२० ते १९५६ पर्यंत त्यांनी अस्पृश्यता नष्ट करण्यासाठी अहोरात्र कष्ट घेतले. शेवटी १९५६ ला बौध्द धर्मात प्रवेश करून दलितांना नवीन धर्माची द्वारे खुली करून दिली? बौध्द धर्म म्हणजे समतेला महत्व देणारा धर्म डॉ. बाबासाहेबांनी या धर्मात प्रवेश करून आपल्या बांधवांना हिंदू धर्मातील गुलामगिरीतून मुक्त केले. त्यांनी लिहिलेल्या राज्यघटनेत अस्पृश्यता कायद्याने बाद ठरविली. आज अस्पृश्य, नेतृत्वामुळेच, कार्यामुळेच त्यांना दलितांचे उध्दारक, मुक्तीदाते म्हणता. दलितांमध्ये आत्मभान व स्वाभिमानाची भावना निर्माण करण्यासाठी डॉ. बाबासाहेबांनी दिलेल्या योगदानामुळेच त्यांचा 'महामानव' म्हणून गौरव केला जातो.

**दलित चळवळीतील त्यांच्या योगदान व कार्याचा आढावा संक्षिप्त रूपात पुढीलप्रमाणे आहे. :–**

**१) बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना :–**

अस्पृश्यांचा आर्थिक व राजकिय विकास घडवून आणण्यासाठी आणि भारतीय समाजापुढे जातीय संस्थेने उभे केलेले भीषण आवाहन मोडून काढण्यासाठी २० जुलै १९२४ रोजी बहिष्कृत हितकारिणी सभेची स्थापना केली. संस्थेचे 'शिका, संघटीत व्हा आणि संघर्ष करा.' हे ब्रीद वाक्य होते. या संसथेमार्फत अस्पृश्य समाजात सुधारणा व जागृती आणि



Late N.P.W. College, Lakhani, Distt. Bhandara
Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara

शिक्षण प्रसारावर भर दिला. दलित समाजातील तरुण व प्रौढ व्यक्तींसाठी रात्रीच्या शाळा, वाचनालये या संस्थेने चालविल्या. दलित समाजात जागृती घडवून आणणे, दलित समाजात शिक्षणाचा प्रसार करणे, दलित समाजाची आर्थिक परिस्थिती सुधारणे यासाठी ही संस्था कार्यरत होती.

**२) समता सैनिक दलाची स्थापना :–**

१९२६ मध्ये बाबासाहेबांनी दलित शोषितांची गैरराजकीय व सांस्कृतिक संघटना म्हणून समता सैनिक दलाची स्थापना केली. या दलाद्वारे दलित तरुणांच्या मानसिक व शारीरिक विकासावर भर दिला गेला. त्यामुळे त्यांना शिक्षण, अनुशासन व आत्मनिर्भरता या शक्तींचा वापर करण्याची प्रेरणा मिळाली. 'शीलावर आधारित शक्ती' असे बोधवाक्य देऊन दलाच्या माध्यमातून दलित तरुणांमध्ये मानसिक, शारीरिक व आर्थिक सामर्थ्यात भर टाकण्यास प्रारंभ केला. युवकांचे ऐक्य, कल्याण व उत्कर्षासाठी ही संस्था कार्य करीत होती.

**३) महाडचा सत्याग्रह :–**

महाड गावातील तळे नगरपालिकेने ठराव करून सर्व जातीधर्मांच्या लोकांसाठी खुले करवले होते. परंतु सवर्णांच्या भितीने अस्पृश्य सर्व जातीधर्मांच्या लोकांसाठी खुले केले होते. परंतु सवर्णांच्या भितीने अस्पृश्य तळावावर पाणी भरण्यासाठी जात नसत. या अन्यायाविरोधात बाबासाहेबांनी महाडचा लढा उभारला. अस्पृश्यांना आपला हक्क बजावण्यासाठी संघटित करून २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह करून महाडचे चवदार तळे अस्पृश्यांसाठी खुले करून घेतले. महाडच्या चवदार तळ्यावर अस्पृश्यांचाही हक्क आहे, हे आपल्या कृतीने पटवून दिले. त्याचे पूर्वास्पृश हे आपल्या हक्कासाठी आता भीक मागणार नाहीत तर आपले हक्क ते स्वबळावर मिळवतील असा इशारा या चळवळीच्या माध्यमातून केला.

**४) मनुस्मृतीचे दहन :–**

'मनुस्मृती' हा हिंदू धर्मग्रंथ होता. या ग्रंथाने जातीय व्यवस्था व अस्पृश्यतासंबंधीचे निर्बंध यांचे समर्थन करून हिंदू समाज पध्दती व जातीय संस्था यांना बळकटी प्राप्त करून देण्याचे कार्य केले होते. सामाजिक विषमता व उच्च नीच यांचे समर्थन करणाऱ्या ग्रंथाविरूध्द जनमत तयार करून २५ सप्टेंबर १९२७ ला मनुस्मृतीचे जाहीर दहन करून अन्यायकारक ग्रंथाला कायमची मुठमाती मिळावी म्हणून त्यांनी मनुस्मृती ग्रंथाचे दहन करून प्रतिकात्मक कृती केली. या घटनेतून अस्पृश्य वर्गाचे मनोबल वाढण्यास मदत झाली.

**५) काळाराम मंदिर सत्याग्रह :–**

हिंदू धर्मातील उच्चवर्णियांनी अस्पृश्य जातीतील लोकांना अनेक हक्कांपासून वंचीत ठेवले होते. त्यांना साधा मंदिर प्रवेशाचा हक्कदेखील नाकारला होता. तेव्हा अस्पृश्यांना मंदिरात प्रवेश मिळवून समान हक्कासाठी मंदिर प्रवेशाचा सत्याग्रह करण्याचे डॉ. बाबासाहेबांनी ठरविले. अस्पृश्यांच्या प्रवेशाने मंदिरे भ्रष्ट होत नाहीत. देवळे जरी स्पृश हिंदूंनी बांधली असली तरी ती हिंदू धर्माची असून सर्व हिंदू धर्मियांकरीता बांधली आहेत. हिंदुत्व जितकी स्पृशांची मालमत्ता आहे तितकीच ती अस्पृश्यांचीदेखील आहे. हे पटवून देण्यासाठी त्यांनी मंदिर प्रवेशाची चळवळ सुरू करण्याचे ठरविले. त्यासाठी त्यांनी नाशिक येथील काळाराम मंदिराची निवड करून हजारो दलित बांधवासह २ मार्च १९३० रोजी सत्याग्रह केला. त्यानंतर महाराष्ट्रात इतर ठिकाणी सत्याग्रह करून अस्पृश्यांसाठी मंदिर खुले करण्याची चसुरु केली. डॉ.बाबासाहेबांच्या प्रेरणेने महाराष्ट्रात त्यानंतर अनेक ठिकाणी मंदिर प्रवेश चळवळी सुरु झाल्या.

**६) राजकीय हक्कासाठी लढा दिला :–**

डॉ.बाबासाहेबांनी अस्पृश्यांच्या राजकिय हक्कासाठी सायमन कमिशनसमोर साक्ष देऊन अस्पृश्यांसाठी राखीव जागांची मागणी केली. लंडन येथे भरलेल्या गोलमेज परिषदेत अस्पृश्याचे प्रतिनिधी म्हणून सहभाग घेतला. या परिषदेत त्यांनी अस्पृश्यांच्या राजकिय हक्कासाठी स्वतंत्र मतदारसंघाची मागणी केली. गोलमेज परिषदेनंतर रॅम्से मॅकडोनाल्ड यांनी जातीय निवाडा जाहीर करून अस्पृश्यांची स्वतंत्र मतदारसंघाची मागणी मान्य केली. पण गांधीनी अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघ देण्याच्या निर्णयाच्या विरोधात पुण्याच्या येरवडा कारागृहात उपोषण सुरु केले. उपोषणामुळे देशभर तणावाचे वातावरण निर्माण झाले. हा तणाव कमी करण्यासाठी भारतातील नेत्यांनी महात्मा गांधी आणि डॉ. बाबासाहेब यांच्या तडजोड घडवून आणली. तडजोडीअंती पुणे करार होऊन अस्पृश्यांना स्वतंत्र मतदारसंघाऐवजी राखीव मतदारसंघ देण्यात आले. डॉ. बाबासाहेबांनी अस्पृश्यांबरोबरच शेतकरी आणि कामगार वर्गाच्या आर्थिक विपन्नावस्थेची कारणमिमांसा करून श्रमिकांची जातीनिरपेक्ष संघटना



Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
N.P.W. College Lakhani Distt. Bhandara

बांधण्यासाठी आणि सामाजिक क्रांतीला राजकीय व आर्थिक आधार देण्यासाठी स्वतंत्र मजूर पक्षाची स्थापना केली. मुंबई विधीमंडळात विरोधी पक्षनेता म्हणून डॉ. बाबासाहेबांनी भूमिका पार पाडली. या कालखंडात खोती निर्मूलन, महार वतन नष्ट करणारे विधेयक इ. विधायक कार्य केले.

अनुसूचित जातींच्या विशिष्ट हितसंबंधाचे रक्षण करण्यासाठी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर दलितांची उपेक्षा होऊ नये, त्यांना विशेष सवलती व संरक्षण प्राप्त करून घेता यावे यासाठी व त्यांची स्वतंत्र अस्मिता प्रस्थापित करण्यासाठी १९४२ मध्ये शेडयूल्ड कास्ट्स फेडरेशन पक्षाची स्थापना केली. या पक्षाने घटना समितीला निवेदन देऊन अस्पृश्यांचे हित व हक्क सुरक्षित राहावेत याकरीता विशेष सांविधानिक तरतुदी करण्याचा आग्रह धरला.

**७) भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार :–**

डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्यातील विविध अष्टपैलू व्यक्तिमत्वाचा प्रभाव भारतीय राज्यघटनेवर पडल्याशिवाय राहिला नाही. भारतीय राज्यघटनेचा मसुदा समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी केलेले काम व परिश्रम यामुळे त्यांना भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार म्हणतात. घटनेने २० नोव्हेंबर १९४८ रोजी सतरावे कलम संमत करून अस्पृश्यतेची रूढी कायद्याने नष्ट केली. अस्पृश्यता पाळणे कायद्याने गुन्हा मानण्यात आला.

**८) धर्मांतर व रिपब्लिकन पक्ष :–**

हिंदू धर्मात राहून डॉ.बाबासाहेबांनी अस्पृश्यांना हक्क मिळवून देण्यासाठी प्रयत्न केले. पण सवर्ण हिंदूंच्या अनुदार वृत्तीमुळे हिंदू धर्मात राहून न्याय मिळणार नाही, असे त्यांच्या लक्षात आल्यावर त्यांनी येवला या ठिकाणी १९३५ मध्ये घोषणा केली होती की, ''दुदैवाने मी हिंदू हिंदू धर्मात अस्पृश्य जातीत जन्माला आलो असलो तरी मी हिंदू म्हणून मरणार नाही.'' त्यानंतरही हिंदू धर्माने त्यांना न्याय न दिल्यामुळे १४ ऑक्टोबर १९५६ ला विजयादशमीच्या मुहूर्तावर त्यांनी लाखो दलित बांधवासह नागपूर येथे बौध्द धर्माची दिक्षा घेतली.

इ.स. १९५२ मध्ये झालेल्या लोकसभा निवडणूकीत शेडयूल्ड कॉस्ट फेडरेशन या पक्षाचा पराभव झाला. स्वतः बाबासाहेबांचा निवडणूकीत पराभव झाला. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, निव्वळ दलितांची संघटना असून चालणार नाही तर पूर्ण अस्पृश, गरीब स्पृश, अनुसुचित जाती व जामतींची एकत्र ताकद निर्माण करायला पाहिजे. त्यातूनच कॉंग्रेसच्या तुल्यबळ एखादी संघटना/पक्ष उभा राहू शकेल. त्यादृष्टीने त्यांनी रिपब्लिकन पक्षाची स्थापना करण्याचे स्वप्न पाहिले. पण त्यांच्या महापरिनिर्वाणामुळे त्यांचे हे स्वप्न पूर्ण झाले नाही.

अशाप्रकारे दलित चळवळीत महानायकाच्या स्वरूपात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे कार्य मानले जाते. दलित समाजात खऱ्या अर्थाने जागृती निर्माण करण्याचे श्रेय त्यांना जाते. त्यांनी केलेल्या कार्यामुळे दलित वर्गांना सामाजिक न्याय व हक्क मिळाले. त्यांच्या मुलमंत्रातून त्यांच्या मृत्यूनंतरसुध्दा दलित समाजातील लोक आपल्या हक्कासाठी आवाज उठवित आहेत. चळवळी करीत आहेत.

**संदर्भ सुची :–**


- डॉ. व्ही.जी. सोमकुवर – समकालीन भारताची निर्मिती (१९५०–२०१९), प्रशात पब्लिकेशन ३, प्रतापनगर, श्री संत
- ज्ञानेश्वर मंदिर रोड, नूतन मराठा महाविद्यालयाजवळ जळगाव–४२५००१
- mr.m.wikipedia.org
- डॉ. भा.ल. भोळे – आधुनिक भारतातील राजकीय विचार, पिंपळापुरे ॲण्ड क. पब्लिशर्स नागपूर.
- https://marathime.com
- https://www.biographymarathi.com
- डॉ. अशोक चौसाळकर – आधुनिक भारतीय राजकीय विचार : प्रवाह आणि अंत:प्रवाह, प्रतिमा प्रकाशन १३६२,
- सदाशिव पेठ, औदुंबर अपार्टमेंट, नवा विष्णुमंदिर चौक, पुणे–४११०३०
- डॉ. अलका देशमुख – लोकशाहीचे बदलते स्वरूप आणि निवडणुकांचे राजकारण, साईनाथ प्रकाशन धरमपेठ नागपूर–१०




Off. Principal
Late. N.P.W. College
Lakhani, Distt. Bhandara
Late N.P.W. College Lakhani Distt. Bhandara